भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७१८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/१०/२०१७

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे खोली मध्ये प्रवेश करून लपुन बसला होता व ती झोपली असतांना विनयभंग केला, तेव्हा फिर्यादी ओरडली असता तिचा तोंड दाबुन खाली पाडल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५६,३५४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेसरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**२) फटाके फोडण्याच्या कारणा वरून काठी व सलाखीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा अभिषेक योगेश मेश्राम हा त्याचे घरा समोर फटाके फोडल्याने, यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या घरात आत प्रवेश करून फिर्यादी व तिचे पतीला काठीने व सलाखीने आरोपी क्र. २ ने फिर्यादी व फिर्यादीचे पतीच्या हातावर व पाठीवर मारून जखमी केले, व आरोपी क्र. १,३,४ यांनी थापड बुक्यांनी मारपीट केल्याने, फिर्यादी सौ. ललीबाई कुवर राऊत वय ४५ वर्ष रा. झोपटपट्टी पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५२,३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगीर पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**३) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून खाली पाडुन फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/१०/२०१७ चे १६.०० ते १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. चंद्रभागा विश्वनाथ दहिवले वय ५४ वर्ष रा. लाखांदुर हा त्याचे घरी हजर असतांनी वालाचे व वांग्यांच्या झाडाची नुकशानी कोणी केली, म्हणुन बडबड करीत असता, यातील आरोपीने फिर्यादीचे डोक्याचे केश पकडुन जमीनीवर खाली पाडुन मारपीट केली व ढकंल्याने उजव्या पायाचे टोंगऱ्यावर फॅक्चर झाल्याचे डॉ. एक्सरे रिपोर्ट व फिर्यादीचे बयाना वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२५ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फुकट पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**४) जनावराची कत्तल करून मास विक्री करण्याचे उदद्देशाने व चाऱ्या पाण्याची व्यवस्था न करता कृरतेची वागणुक देतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोद. :–**

दिनांक १७/१०/२०१७ चे २१.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी जनावराची कत्तल करून मास विक्री करण्याचे उददशाने ०७ जनावरे जिर्ण झालेल्या ईमारतीत बांधताना दिसले, व त्यांना जनावरे कोठुन आनले व कशा करीता आनले, या बाबद विचार पुस केली असता, त्यांनी समाधान कारक उत्तर दिले, नाही व जनावरांना चाऱ्या पाण्याची व्यवस्था न करता त्याना कृरतेची वागणुक देतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. गुरव यांचे रिपोर्ट पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ५(अ) (ब) प्रा. नि. सं. कायदा ११ (ड) प्राण्या. नि. वा. कायदा भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी आतराम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) सार्वजनीक ठिकाणी वाहन थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस अडथडा व लोंकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/१०/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅजीक गाडी ही आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभी करतांनी मिळुन आल्याने, पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) विहीरीचे पाण्यात प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद:—

दिनांक १७/१०/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी यशवंत भाऊराव रंगारी वय २८ वर्ष रा. दिघोरी हा त्याचे घरी हजर असतांनी त्याचा लहान भाऊ अशोक भाऊराव रंगारी वय ५५ वर्ष रा. दिघोरी त्याचा घरी आला व वडील सकाळी ०८.०० वाजता घरी हजर होते व त्यानंतर लाखादुंर वरून कामा निमीत्त जावुन सयंकाळी १७.०० वाजता परत आले ,तेव्हा वडील घरी हाजर नव्हते असे सागींतल्यावर २०.०० वा. दरम्यान दोघेही मिळुन वडीलाचा शोध घेत असता, २२.०० वा. डॉ. आंबेडकर पुतळयाचे बाजुला त्याचे हातातील काठी व अंगातील कपडे दिसले, विहीरीत पाहीले असता मृतक वडीलाचे प्रेत उभडया स्थितीत तरंगतांनी दिसुन आल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील पोहवा. तलमले पो.स्टे दिघोरी हे करीत आहेत.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १८/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ३३ केसेस करण्यात आले आहे.

(पो.नि.एस.बी.घुसर )
पो.नी.स्था.गु.शा भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.